# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

## परिपत्रक क्र. २७३/२०२५

## पीएच्.डी. प्रवेशासंबंधी सूचना

**विषय :** पेट परीक्षेतून सूट मिळालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास मुदतवाढीबाबत..

**संदर्भ :** विद्यापीठ परिपत्रक क्र. २३०/२०२५ (शै.प्रवेश/२३०७) दि. ३०/०८/२०२५

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया २०२४-२५ मधील प्रथम फेरीत निवड न झालेले पेट पात्र व पेट परीक्षेतून सूट मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरी आयोजित करण्यात येणार असून याव्यतिरिक्त पेट परीक्षेतून सूट मिळण्यास पात्र आहेत, अशा विद्यार्थ्यांकडून दिनांक १ सप्टेंबर, २०२५ ते १० सप्टेंबर, २०२५ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि, मा. अधिकार मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी व काही विद्यार्थ्यांनी मुदतवाढीची मागणी केली असल्याने पेट परीक्षेतून सूट मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिये (PET) मध्ये पात्र परंतु प्रथम फेरीत निवड न झालेले व प्रवेश परीक्षेतून (PET) सूट मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना संशोधन केंद्र निवडण्यासाठी पर्याय त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. त्याबाबत सर्व संबंधित विद्यार्थ्यांना परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/२५८८ )
दिनांक : ०७/१०/२०२५ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव